# RAM AGENCY

Gram : FRIDGEMAN Phone : 3154

## -: DEALERS IN :-

- REFRIGERATORS
- AIR-CONDITIONERS
- WATER COOLERS
- TELEVISIONS
- FANS
- AIR-COOLERS
- WASHING MACHINES
- WATER HEATERS
- FILTERS
- MIXERS
- VOLTAGE STABILISERS
- ELE. APPLIANCES, STEEL & WOODEN FURNITURE

**HEAD OFFICE & SHOW ROOM**

15, Kisan Kranti Bldg.
Market Yard, Station Road
AHMEDNAGAR-414001

**BRANCH**

4411, Juna Magalwar Bazar,
Shani Chowk, Behind Asha
Talkies, AHMEDNAGAR 414001

# ATRI SALES CORPORATION

**MANUFACTURER & SUPPLIERS FOR**

Precision Scientific Apparatus, Glasswares,
Pure Chemicals

For Schools, Colleges & Research Labs

**M. G. ROAD, AHMEDNAGAR (M.S.)**

गुरुप्रसाद, नगर

# । अर्थ ।

आर्थिक विषयांच्या अभ्यासास
प्राधान्य देणारे त्रैमासिक

एप्रिल ते जून १९८२ वर्ष ८ वे, अंक १ ला


## अद्ययावत आर्थिक आकडेवारी

## संपादकीय

रिझर्व्ह बँकेचे डिसेंबर १९८१ चे बुलेटिन नुकतेच हाती आले. त्यासोबत भारतीय अर्थव्यवस्थेचा अद्ययावत संदर्भ घेण्यासाठी उपयुक्त अशा आकडेवारीची छोटी पुरवणी प्रसिद्ध झाली आहे. त्याच्या सहाय्याने भारतीय आर्थिक प्रश्नांची चिकित्सा आणि निदान करण्यासाठी अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना त्यांची आकडेवारीची शस्त्रे अद्ययावत करून घेता येतील.

१९७०-७१ मध्ये एकूण चलनपुरवठा १०,५७८ कोटी रुपये होता. मागील वर्षी तो ५५,४१३ कोटी (डिसेंबर १९८०) होता. तर या गेल्याच वर्षी म्हणजे डिसेंबर ८१ मध्ये तो ६१,६१५ कोटी रुपये झाला आहे. त्यातील रोख चलनाचे आकडे (नोटा + नाणी) अनुक्रमे ४३७१, १३४६१ आणि १३७९८ कोटी रुपये आहेत. ढोबळपणे गेल्या १० वर्षात एकूण चलनात सहापट वाढ झाली तर रोख पैशाच्या पुरवठ्यात फक्त तीनपट वाढ झाली आहे. ठेवीरूप पैशात (बँक डिपॉझिटस्) मात्र १९७० च्या २९७० कोटीवरून डिसेंबर १९८१ मध्ये १०८०५ कोटी म्हणजे पाचपट वाढ झाली. सारांश एकूण चलनवाढीत $M_1$ किंवा नोटा व नाणी यांच्या वाढीपेक्षा $M_2$ व $M_3$ बँक ठेवींचाच भाग मोठा आहे. चलनवाढ रोखण्यासाठी म्हणूनच बँकांच्या ठेवींवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता अनिवार्य झाली आहे विशेषत: बँकांनी दिलेल्या कर्ज ठेवींमध्ये माल गेल्या दहा वर्षात प्रचंड वाढ झालेली दिसते.

सरकारला बँकांनी दिलेल्या कर्जाचे आकडे पहा. १९७० मध्ये ते ५४५७ कोटी रुपये तर १९८१ मध्ये २८,५०९ कोटी रुपये असे आहेत. क्रेडिट स्क्वीझ् वा पतगळचेपीचे धोरण करावयाचे असल्यास बँकांकडून सरकारी क्षेत्राला देण्यात येणाऱ्या कर्जावर देखील निर्बंध घालणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बँकांकडून व्यापारउद्योग क्षेत्रांना १९७० मध्ये ६४६२ कोटी रुपये कर्ज उपलब्ध झाले. १९८१ मध्ये तो आकडा ४१०४५ कोटी रुपये आहे.

बँकांच्या संचित ठेवींचाही सूक्ष्म अभ्यास केल्यास असे दिसते की गेल्या ११ वर्षात ठेवींच्या आकड्यात प्रचंड वाढ आहे. उदा. १९७० मध्ये एकूण बँकठेवी ५९०६ कोटी रुपये होत्या. १९८१ मध्ये त्यांचा आकडा ४३.८३५ कोटी रुपये आहे. मात्र अर्थशास्त्रज्ञांना आणि देशातील वित्ततज्ज्ञांना विचार करायला लावणारी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. एकूण बँक डिपॉझिटस्मध्ये मुदती ठेवी (Fixed Deposits) ३४,८२३ कोटी रुपयांच्या असून मागणी ठेवी मात्र अत्यंत कमी आहेत. १९७० पूर्वी मुदतबंद ठेवी आणि चालू ठेवी यांचे परस्परप्रमाणे संतुलित होते आता त्यात विसंगति दिसते. गेल्या वर्षात बँकांची डिपॉझिटस् ही समाधानकारकरणे वाढलेली नाहीत.

एका बाजूने प्रकर्षित पतनियंत्रण (Credit Squeez) आणि दुसऱ्या बाजूने पतठेवींच्या संचयास उत्तेजन (Deposit mobilisation) या दुहेरी डावपेचांनी भाववाढ कमी करण्याचा प्रयत्न असफल होण्याची दोन कारणे म्हणजे पतसंकोचामुळे औद्योगिक घसरण (Recession) आणि बँकठेवींमधील संचयही कमी असल्यामुळे पतनियंत्रणाचा मूळ उद्देश सफल होऊ शकत नाही. देश एका विचित्र कोंडीत सापडला आहे यात शंका नाही. पतनिर्बंध सैल केल्यास भाववाढ

# ॥ अर्थ ॥

आर्थिक विषयाच्या अभ्यासास
प्राधान्य देणारे त्रैमासिक

वर्ष ८ वे अंक पहिला

एप्रिल ते जून – १९८२

वार्षिक वर्गणी : रुपये तीस

संपादक–प्रा. कमलाकर परचुरे

एप्रिल ते जून अंक

संचालिका – सौ. श्यामा परचुरे

संचालन सहाय्य- { कु. मोना परचुरे
कु. बीना परचुरे

सहसंपादक – सुरेश ढमढेरे

संपर्क – १५ फर्ग्युसन कॉलेज आवार, पुणे–४
दूरध्वनी नं. ५२७०९


---

होण्याची भीति, पतनिर्बंध प्रखर केल्यास मंदीची आपत्ती अशा कात्रीत अर्थव्यवस्था आहे. बँकांचा संसार देखील अडचणीचा झाला आहे. बऱ्याच बँकांची नफा मिळवण्याची क्षमता क्षीण झाली आहे. उद्योगपती आणि व्यापारी मंडळी यांच्या हाकाटीमुळ प्रकल्पित पतनियंत्रणाचे धोरण सैल होण्याची चित्रे दिसतात पण त्याचा लाभ मोठ्या उद्योगांना अधिक प्रमाणावर होऊन आजारी लघुउद्योगांना फक्त एक मचाचे बोर्ट चाखायला मिळेल असे दिसते. बँकांमधील ठेवी वाढत नाहीत परंतु वित्तीय संस्था वा बिगर बँक पतसंस्था (Non Banling Financial institutions) यांच्या ठेवी तसेच डिबेंचर, कपनी ठेवी, शेअर यांच्या मागणीत वाढ झालेली दिसते. गुंतवणूक करणाऱ्या लोकांना व्याजदरापेक्षा इतर गुंतवणुकी जास्त लाभदायक वाटत आहेत हे त्याचे गमक आहे.

## उद्योगपती चंद्रकांत किर्लोस्कर यांचा तेल समस्येसंबंधीचा वेगळा विचार

उद्योगपती चंद्रकांत किर्लोस्कर यांना जागतिक तेलसमस्या आणि भारताची अर्थव्यवस्था यामधील जो परस्पर संबंध रूढ पद्धतीने लावला जातो तो मान्य नाही. त्यांच्या मते भारतीय अर्थव्यवस्थेतील विकासाची कोंडी (Stagflation), चलनवाढ आणि औद्योगिक घसरण तसेच उत्पादन खर्च वाढ (Cost-push inflation) या सर्वांना तेलसमस्या ही जबाबदार नसून त्या सर्व प्रश्नांची कारणे सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणे, निर्णय आणि प्रशासन यामध्ये दडलेली आहेत वाढत्या चलनवाढ आणि परदेशी चलनाच्या तुटीचे कारण, आयात तेलाच्या खर्चात होणारी वाढ असे सरकार पक्षाकडून दर्शविले जाते. श्री चंद्रकांत किर्लोस्कर यांचे ठाम मत आहे की तेलसमस्या हे भारतीय अर्थव्यवस्थेवर आलेले संकट नसून अर्थव्यवस्था सुधारण्यास अनुकूल असलेले वरदान आहे. त्याचे प्रतिपादन असे की १९७३ पासून तेलाच्या किमतीत जी वाढ झाली त्या कारणानेच भारतातील कृषि उत्पादन, निर्यात व्यापार, परदेशी प्रवासी आणि परदेशात नोकरीसाठी गेलेले भारतीय यांच्याकडून आलेला परदेशी चलनाचा ओघ, परदेशी चलनाचे एकूण वाढते साठे (Surpluses) आणि देशातील रोजगार व उत्पादन यातील वाढ या गोष्टी १९७९ पर्यंत सातत्याने होत राहिल्या.

ओपेक गटातील १३ देशांनी तेलाच्या किंमती वाढविल्यामुळे ते अल्पावधीत संपन्न झाले आणि त्या संपन्नतेमुळेच त्यांचेकडून इतर देशांप्रमाणेच भारतातील कारखानदारी-व्यापार यांना मागणी आणि बाजारपेठ प्राप्त झाली. १९७० पर्यंत भारतातील एकूण व्यापारात ओपेक देशाचा वाटा फक्त ४.७ टक्के होता. तोच

# ॥ अर्थ ॥

आर्थिक विषयाच्या अभ्यासास
प्राधान्य देणारे त्रैमासिक

वर्ष ८ वे अंक पहिला

एप्रिल ते जून – १९८२

वार्षिक वर्गणी : रुपये तीस

संपादक–प्रा. कमलाकर परचुरे

एप्रिल ते जून अंक

संचालिका – सौ. श्यामा परचुरे

संचालन सहाय्य- { कु. मोना परचुरे, कु. बीना परचुरे

सहसंपादक { श्रीवल्लभ कुवळेकर, सुरेश ढमढेरे

संपर्क – १५ फर्ग्युसन कॉलेज आवार, पुणे–४
दूरध्वनी नं. ५२७०९


होण्याची भीति, पतनिर्बंध प्रखर केल्यास मंदीची आपत्ती अशा कात्रीत अर्थव्यवस्था आहे. बँकांचा संसार देखील अडचणीचा झाला आहे. बऱ्याच बँकांची नफा मिळवण्याची क्षमता क्षीण झाली आहे. उद्योगपती आणि व्यापारी मंडळी यांच्या हाकाटीमुळे प्रकर्षित पतनियंत्रणाचे धोरण सैल होण्याची चित्रे दिसतात पण त्याचा लाभ मोठ्या उद्योगांना अधिक प्रमाणावर होऊन आजारी लघुउद्योगांना फक्त एक मधाचे बोट चाखायला मिळेल असे दिसते. बँकांमधील ठेवी वाढत नाहीत परंतु वित्तीय संस्था वा बिगर बँक पतसंस्था (Non Banling Financial institutions) यांच्या ठेवी तसेच डिबेंचर, कपनी ठेवी, शेअर यांच्या मागणीत वाढ झालेली दिसते. गुंतवणूक करणाऱ्या लोकांना व्याजदरापेक्षा इतर गुंतवणूकी जास्त लाभदायक वाटत आहेत हे त्याचे गमक आहे.

## उद्योगपती चंद्रकांत किर्लोस्कर यांचा तेल समस्येसंबंधीचा वेगळा विचार

उद्योगपती चंद्रकांत किर्लोस्कर यांना जागतिक तेलसमस्या आणि भारताची अर्थव्यवस्था यामधील जो परस्पर संबंध रूढ पद्धतीने लावला जातो तो मान्य नाही. त्यांच्या मते भारतीय अर्थव्यवस्थेतील विकासाची कोंडी (Stagflation), चलनवाढ आणि औद्योगिक घसरण तसेच उत्पादन खर्च वाढ (Cost-push inflation) या सर्वांना तेलसमस्या ही जबाबदार नसून त्या सर्व प्रश्नांची कारणे सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणे, निर्णय आणि प्रशासन यामध्ये दडलेली आहेत. सध्याच्या चलनवाढ आणि परदेशी चलनाच्या तुटीचे कारण, आयात तेलाच्या खर्चात होणारी वाढ असे सरकार पक्षाकडून दर्शविले जाते. श्री चंद्रकांत किर्लोस्कर यांचे ठाम मत आहे की तेलसमस्या हे भारतीय अर्थव्यवस्थेवर आलेले संकट नसून अर्थव्यवस्था सुधारण्यास अनुकूल असलेले वरदान आहे. त्यांचे प्रतिपादन असे की १९७३ पासून तेलाच्या किंमतीत जी वाढ झाली त्या कारणानेच भारतातील कृषि उत्पादन, निर्यात व्यापार, परदेशी प्रवासी आणि परदेशात नोकरीसाठी गेलेले भारतीय यांच्याकडून आलेला परदेशी चलनाचा ओघ, परदेशी चलनाचे एकूण वाढते साठे (Surpluses) आणि देशातील रोजगार व उत्पादन यातील वाढ या गोष्टी १९७९ पर्यंत सातत्याने होत राहिल्या.

ओपेक गटातील १३ देशांनी तेलाच्या किंमती वाढवल्यामुळे ते अल्पावधीत संपन्न झाले आणि त्या संपन्नतेमुळेच त्यांचेकडून इतर देशांप्रमाणेच भारतातील कारखानदारी-व्यापार यांना मागणी आणि बाजारपेठ प्राप्त झाली. १९७० पर्यंत भारतातील एकूण व्यापारात ओपेक देशाचा वाटा फक्त ४.७ टक्के होता. तोच

गेल्या दहा वर्षांत १६ टक्क्याहून अधिक झाला आहे. म्हणजेच आपल्या ओपेक देशातील निर्यात उत्पन्नात सुमारे चौपट वाढ केवळ दहाच वर्षांत झाली. १९७० पर्यंत आपण त्यांना चहा, ज्यूट, कॉफी, वस्त्रे, कातडी या परंपरागत वस्तूच निर्यात करीत होतो. आता यंत्रसामग्री आणि अद्ययावत तंत्रज्ञान निर्यात करीत आहोत. या अभियांत्रिकी वस्तूत बोज निर्माण करण्यास लागणारी सामग्री, पोलादी नळ्या, रेल्वे वाघिणी, मोपेड, मोटारी ट्रक, बांधकामाला लागणारे साहित्य आणि तंत्र इ. चा समावेश होतो. एकट्या सौदी अरेबियांकडून १९८०-८१ या वर्षात १७१ कोटी रुपयांची निर्यात-प्राप्ती झाली. तेलसमस्येमुळे आम्हीही जागे झालो असून आमच्या सागरी किनारपट्टीत विविध ठिकाणी पेट्रोल हुडकून काढण्याचे आमचे प्रयत्न निकराने सुरू झाले. त्याची फळे आगामी ५ वर्षांतच मिळू लागतील. त्यांच्या मते, आजच्या चलनवाढ आणि विकासातील असरंजोस खालील चुकीची धोरणे आणि घटक जबाबदार आहेत ते म्हणजे — अ) राष्ट्रीय गुंतवणूकीतील ६० टक्के गुंतवणूक ही अकार्यक्षम पद्धतीने सरकारी क्षेत्रात वापरली जाते. ब) अनुत्पादक प्रकारच्या सरकारी खर्चात अवास्तव वाढ व उधळपट्टी क) तुटींचे अर्थकारण ड) लोकांच्या हातात पडणाऱ्या चलनात प्रतिवर्षी १५ टक्क्याची बेसुमार वाढ आणि इ) या ना त्या कारणाने औद्योगिक उत्पादन क्षमतेचा न्यून वापर (Capacity Utilisation of 50 to 70 Percent only)……… खाजगी उद्योगांच्या प्रत्यक्ष करात एक ते दोन वर्षे ५० टक्के रिबेट दिल्यास त्यांच्याकडून २००० कोटी रुपयांची गुंतवणूक तेल उत्पादनाच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण करू शकेल. तेलसमस्येचो सबब पुढे करून देशातील चुकीच्या धोरणांवर पांघरूण घालत बसण्यापेक्षा तेलसमस्या ही अर्थव्यवस्थेला चालून आलेली चांगली संधी आहे अशा प्रकारची व्यवहार्य (Pragmatic) धोरणे आवश्यक आहेत असे त्यांचे मत आहे.

## शेअर बाजारात निरुत्साहाचे वातावरण

मागल्या वर्षी देशातील एकूण ९ शहरातील शेअरबाजारांमधील एकूण गुंतवणूकीची उलाढाल ७१८ कोटी रुपयांची होती. या वर्षी ती २३२ कोटी रुपयांइतकी म्हणजे तिपटीहून अधिक कोसळली आहे. या सर्व ९ शहरांमध्ये मुंबई स्टॉक एक्स्चेंजमधील व्यवहार सर्वात मोठ्या प्रमाणावर नेहमीच असतात. या वर्षी मुंबईच्या शेअर बाजारातही मंद हवा आहे. 'रिलायन्स टेक्स्टाइल' या नामवंत कंपनीच्या ५० कोटी रुपयांच्या डिबेंचर्स विक्रीचे नुकतेच मुंबई शेअर बाजारात झालेले प्रकरण गंभीर स्वरूपाचे आहे. कंपनीचे विक्रीला काढलेले डिबेंचर किंमतीत मार खावे या दृष्टीने काही सटोडिये आणि ब्रोकर यांनी अफवांची मोहीम सुरू करून ज्या अयोग्य व्यापारपद्धती (Unfair trading) अंगिकारल्या त्यावर स्टॉक एक्स्चेंजच्या नियामक मंडळाला योग्य नियंत्रण ठेवण्यात आलेले अपयशही चिंतनीय आहे. हातात डिबेंचर उपलब्ध नसूनही या निरासदारांनी त्याच्या विक्रीचे अफाट व खोटे वायदे करावे आणि त्यासंबंधी मुंबई स्टॉक एक्स्चेंजने मूग गिळून बसावे ही घटना एकूण शेअर बाजारासंबंधीची विश्वसनीयता गमावण्यास कारणीभूत होईल. आधीच शेअर बाजारात निरुत्साहाचे वातावरण त्यात अशा बेफाट सौदेबाजीची भर असल्यास त्यामुळे खाजगी उद्योगांना आवश्यक असलेल्या भांडवल बाजाराची (Capital market) घडी विस्कटू नये अशी काळजी घेतली जावी. पुण्यात हा अंक प्रसिद्ध होताना नव्याने शेअर बाजार सुरू होतो आहे. येथील स्टॉक एक्स्चेंजच्या नियामक मंडळात उद्योग-वित्त-व्यापार व्यवस्थापन या क्षेत्रातील लौकिकवान, प्रतिष्ठित व्यक्तींबरोबरच विद्या आणि समाजकारण या क्षेत्रातील कार्यक्षम आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तींचा समावेश करणे जरुरीचे आहे म्हणजे पुण्याच्या शेअर बाजाराची प्रतिष्ठा आणि विश्वासार्हता वाढण्यास मदत होईल.

□ □

---

**नव्या पुस्तकाचे स्वागत :**

अर्थचे लेखक, चाहते व निकटवर्ती स्नेही, नामवंत लोकसंख्या शास्त्रज्ञ व संशोधक प्रा. वसंत प्रभाकर पेठे यांनी Population Policy and Compulsion in Family planning हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध केले. त्याकरता त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

पुस्तकाच्या प्रस्तावनेतच लोकसंख्या नियोजनाच्या अभ्यासकांना भरपूर सैद्धांतिक संदर्भ मिळाल्यामुळे हे पुस्तक अर्थशास्त्र, विकासाचे शास्त्र, समाजशास्त्र, आणि जीवशास्त्र इ. विषयांच्या विद्यार्थ्यांना आणि राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नासंबंधी चिकित्सक आस्था असणाऱ्या नागरिकांना हे पुस्तक अत्यंत उपयुक्त तसेच रोचक वाटेल. या पुस्तकाचा पर्याप्त परामर्श अर्थच्या आगामी अंकात घेण्याचा विचार आहे.

□ □

# आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कर्जाचे दुष्परिणाम

प्रा. पी. आर. ब्रह्मानंद
संचालक अर्थशास्त्रविभाग, मुंबई विद्यापीठ

आपल्या देशाच्या परकीय चलनाचा समतोल १९८०-८१ पासूनच बिघडेला होता ही गोष्ट कोणी ध्यानातच घेतली नाहीं. सहाव्या योजनेच्या दुसऱ्या वर्षी (नुकतेच संपलेले आर्थिक वर्ष) परकीय चलनाची दुःस्थिती अगदीच खालावली अशी दिसते. १९८१-८२ च्या पहिल्या साडेसात महिन्यात परकीय चलनाचा राखीव साठा १४०० कोटी रुपये म्हणजे जवळजवळ २५ टक्के इतक्या रकमेने खाली गेला असे अर्थमंत्र्यांनी संसदेत सांगितले. १९८१ च्या सप्टेंबर अखेर अर्थमंत्री आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे गेलेले दिसतात.

सध्या परकीय चलनाचा साठा ३४०० कोटीच्या आसपास असावा असा अंदाज आहे. गतसाली १९८०-८१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून ८७० कोटी रु. चे कर्ज मिळाले ते विचारात घेतल्यास परकी चलन त्यासाठी १२०० काटींनी घटले. याची कारणे — अ) निर्यातीत हळूहळू घट ब) परदेशातून येणाऱ्या नक्त पैशाचे प्रमाण कमी क) तेलाचे दर सतत वाढल्याने आयातीत प्रचंड वाढ ड) प्रत्यक्षातील स्थानिक असमतोल.

त्यात आम्ही पुढील भर घातली — अ) आम्ही व्याजाचे दर परदेशापेक्षा ५ टक्के कमी ठेवले. ब) प्रत्यक्ष हाताात पडणाऱ्या (आऊटपुट) प्रमाणापेक्षा १० टक्के जास्त कर्ज व नाणेपुरवठा स्थानिक बाजारात केला क) पोलाद, सिमेंट, कागद, वृत्तकागद यासारख्या दुर्मिळ वस्तूंच्या वापराला अयोग्य प्रोत्साहन दिले. ड) चलनवाढीचे प्रमाण उलटवण्यासाठी आणि प्रति अर्थव्यवस्थेची व्याप्ती घटविण्यासाठी आवश्यक त्या ठोस उपाययोजना केल्या नाहीत. थोडक्यात म्हणजे कमकुवत आणि उदास आर्थिक, वित्तीय व आयात धोरणामुळे ही चिंताजनक परिस्थिती उद्भवली आहे. अति डावे व अति उदार या दोघांनाही नाराज करावयाचे नाही या धोरणामुळे अधिकारी कोणतीही उपाययोजना करण्यास नाराज असतात. अशा परिस्थितीत सहाव्या योजनेला जर कात्री लावावयाची नाही तर कर्ज काढण्याखेरीज गत्यंतरच नव्हते.

सहावी योजना मान्य करताना संसद व सर्व राज्य-सरकारांनी ही व्यापारातील तफावत व परिणामी परदेशातून कर्ज उभारणे यास मान्यता दिली. योजनेत १२००० कोटी रु. (१९७९-८०) च्या किमतीनुसार आजची किंमत धरली तर हा आकडा १५००० कोटीत जाईल) तूट धरण्यात आली आहे. आणि त्यासाठी जागतिक संस्था व व्यापारातून पैसा उभारण्याची तरतूद आहे. ८८ टक्के तूट ही महत्त्वाच्या वस्तूंचे उत्पादन सार्वजनिक क्षेत्रात असल्यामुळे आहे.

आपल्या मालाला परदेशातील मागणी कमी झाली असल्याचे कारणही त्यांनी सांगितले होते.

१९८०-८१ मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पादन त्यावेळेच्या भावपातळीप्रमाणे १३५००० कोटी रु. होईल. १९८१-८२ जवळपास १५७००० कोटी रुपये तर व्यापारी तूट एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात १९८०-८१ ची ४.१ टक्के तर १९८१-८२ ची तूट ६००० ते ७००० कोटींच्या दरम्यान, म्हणजे ४ ते ४.२ होईल. ही तूट पुढील मार्गांनी भरून काढण्यात आली. १००० ते १२०० कोटी परकी राखीव चलनाच्या साठ्यातून, व्यापारी क्षेत्रातून कर्जभारणी १००० ते १२०० कोटी, अप्रत्यक्ष आवक १५०० कोटी, परकी मदत ५०० ते ते ६०० कोटी, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी १००० ते १५०० कोटी. यावर्षी कर्जातूनच २५ टक्के तूट भरून यईल असा अदाज आहे. पुढील तीन वर्षे हिच परिस्थिती राहील. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कर्जातूनच ही तूट भरून काढण्याचे एकूण राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण १ टक्का आहे पण आयातीच्या १२ टक्के आहे.

योजनेतील अंदाजानुसार, ही पुरवठा तूट, खते, खाद्यतेले, मानवनिर्मित धागा, सिमेंट, पोलाद, नॉन फेरस मेटल्स, कागद व वृत्तकागद. एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या ३ ते ४ टक्के इतकी आयात तूट राहील. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कर्जातूनच २० ते २५ टक्के तूट भरून निघेल. कामचलाऊ भांडवल व उत्पादन याचे प्रमाण १:३ धरले तर १००० कोटीच्या कर्जावर ३००० कोटी उत्पादन होईल. अशा परिस्थितीत वाढीचे प्रमाण जास्त रहावयास पाहिजे. कर्जाचा वापर काटकोरपणे केला तर ती एकूण ५.२ टक्के वाढ अपेक्षित धरली आहे त्यापैकी २० टक्के याच मार्गाने गाठता येईल. परिणामी सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांचे प्रमाणही वाढेल.

रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार स्थानिक बचतीत उत्पन्नाच्या मानाने १५ टक्के घट झाली आहे. कर्जाच्या सध्याच्या धोरणामुळे बचतीचे प्रमाण वाढविता येईल. त्याचा सुयोग्य संबंध येतो.

रुपयाचा परकी चलनाशी भाव वाजवी आहे असे सांगण्यात येते. जर आपण सहकार्याचे धोरण स्वीकारले तर परकी चलनाच्या संदर्भातील रुपयाचा भाव अधिक मजबूत करता येईल.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कर्जामुळे ५००० कोटी रु. ची व्यापारी उचल करता येईल. थोडक्यात म्हणजे मोठी तफावत भरून काढता येईल.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जे कर्ज व आर्थिक धोरणे सुचविली आहेत ती योग्य आहेत. सहाव्या योजनेच्या विचाराचा तो एक भाग आहे.

स्थानिक चंचल परिस्थितीमुळे उपलब्ध सामग्री वाया जाण्याचा धोका आहे. येथेच आपण कर्जाच्या सापळ्यात अडकलो. यावर पुढील उपाय सुचविण्यात येत आहेत.

१. सरकारने १९८२–८३ साली तुटीच्या अर्थभरणाला संपूर्ण सुट्टी द्यावी. १९८२–८३ च्या अर्थसंकल्पात सरकारी क्षेत्राचे बँक कर्ज शून्यावर आणावे.

२. व्यापारी क्षेत्रात १९८१–८२ च्या पातळीवर १० टक्के वाढ होईपर्यंत कर्ज मर्यादित करते.

३. स्थानिक व्याजाचा दर १५ टक्के (अधिक) करावा.

४. परदेशातून येणारा पैसा खास खात्यात ठेवून त्यावर इंडेक्स-लिंक्ड १५ टक्के (अधिक) व्याज द्यावे. ही खास खाती ५ वर्षांच्या फिक्स्ड डिपॉझिटची असावीत.

५. १९८०–८१ च्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील सोन्याच्या भावानुसार सोन्याच्या ठेवीऐवजी खास खाती उघडण्यास बँकांना परवानगी द्यावी व त्यावर १५ टक्के व्याज द्यावे अर्थात तेही इंडेक्स-लिंक्ड. या ठेवी ५ वर्षे मुदतीच्या कायम असाव्या. बँकेकडील खास कर्जदारांच्या बदल्यात सोने रिझर्व्ह बँकेकडे दिले जाईल. रिझर्व्ह बँकेकडून घ्यावयाच्या कर्जाला या पायावर अटी राहतील. सोने रिझर्व्ह बँकेच्या साठ्यात वाढ करील. १९८०–८१ च्या आंतरराष्ट्रीय किंमतीनुसार रिझर्व्ह बँक त्याची किंमत ठरवील. सरकार रिझर्व्ह बँकेकडून सोने कर्जाऊ घेऊ शकेल. अर्थात १५ टक्के व्याज द्यावे लागेल या मार्गाने सहाव्या योजनेच्या काळात ५००० कोटी रु. चे परकी चलन उपलब्ध करता येणे शक्य होईल. त्यामुळे युरो-मार्केट मधील भारताची पत वाढेल.

भारताने स्थानिक बाजारातून परकी चलन कर्जाऊ घ्यावे व तेही परदेशात ज्या भावात व अटींवर मिळते त्याचे असे करणेच योग्य आहे. कारण हस्तांतर स्थानिकच होणार आहे.

६. तेल संशोधन व तेल उत्पादनाला अग्रक्रम देण्यात यावा. स्थानिक तेल पुरवठा वाढविण्याच्या मार्गात कोणतेही तात्विक अडथळे निर्माण करू नयेत. सध्या देशात जो तेलाचा वापर होत आहे तो किमान १० टक्क्यांनी तरी कमी करावा. त्याच-प्रमाणे वृत्तपत्र कागद, कागद, सिमेंट, पोलाद याच्या वापरावरही नियंत्रण घालणे शक्य होईल. सार्वजनिक क्षेत्रात जर थोडी नियंत्रणे घातली तर हे साध्य होऊ शकेल. शासन या वस्तूंच्या आपल्या खरेदीत १० टक्के कपात करील तर बरीचशी तूट भरून काढता येईल व आयातीतील तफावतही कमी होईल.

७. परदेशात राहणाऱ्या भारतीयांकडून परकी सामान भागिदारी मिळविणे शक्य होईल. खाजगी व सार्वजनिक दोन्ही क्षेत्रात हे सहकार्य मिळविता येईल. अर्थात अटी मात्र झटकन मान्य होतील अशा ठरविल्या पाहिजेत.

५० हजार रु. पर्यंत आयकर व संपत्तीकरातून मुक्त ठेवाव्या व

८. मनिऑर्डरने येणारा पैसा, सल्लागार फी यासारखे जे परकी चलन मिळविण्याचे मार्ग आहेत त्यात मालाची निर्यात वाढवून व मानवी भांडवल गुंतवणूक वाढवून खूप परकी चलन वाढविता येईल. मानवी गुंतवणुकीवर परदेशात २५ ते ३० टक्के नफा मिळतो. देशात त्याच्या अर्ध्यानेही मिळत नाही. कुशल आणि अतिकुशल कामगारांची संख्या वाढवून ती परदेशांत पाठविणे अगदी सहज शक्य आहे. अर्थात यासाठी लागणारी गुंतवणूकही परदेशात राहणाऱ्या भारतीयांकडून येऊ शकेल. त्यांच्याकडून येणारा पैसा हीच गुंतवणूक.

९. बहुद्देशीय बड्या कंपन्यांच्या येथील सहभागाबाबत खूपच वाद माजला आहे. मूलभूत माल तयार करण्यात व उत्पादनाचा खर्च कमी करण्यात जर त्यांचा उपयोग होत असेल तरच त्याचे स्वागत करावे. परंतु अशा सहकार्याच्या योजनांचा अभ्यास करून निर्णय घेण्यासाठी एक स्वतंत्र आयोग नेमणे जास्त चांगले.

१०. चढ्या किमती ही निर्यात विकासातील एक प्रमुख समस्या आहे. भांडवल गुंतवणुकीवरील नियंत्रण, भांडवलाचा मोठा भाग मालासाठी अडकणे, आवश्यकतेपेक्षा जास्त कर्मचारी, कच्च्या मालाचे भरमसाठ भाव, यंत्र चालविण्यास येणारा प्रचंड खर्च आणि आधुनिकीकरणाकडे संपूर्ण दुर्लक्ष यामुळे निर्यात वाढ खुंटते यात ताबडतोब सुधारणा करणे आवश्यक आहे. गुंतवणुकीवर सध्या जे १० टक्के सुटतात त्याऐवजी १५ टक्के सुटतील अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

११. करसुधारणा जो करावयाची त्याचा उद्देश भाव पातळी कमी करणे, परकी चलनांत काटकसर व निर्यातवाढ असे हवेत.

१२. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात चलनवाढ रोखणाऱ्या मार्गानेच पैसा उभा केला पाहिजे. चलनवाढीचा विपरीत परिणाम निर्यातवाढीवर होतो म्हणून ही उपाययोजना आवश्यक आहे.

सध्याच्या परिस्थितीवर हा तात्पुरता तोडगा आहे. यावर आताच मात केली नाही तर सर्व कर्ज संपून जाईल व भविष्यात तूट वाढतच जाईल. म्हणून ताबडतोब नाणे, आर्थिक व प्रत्यक्ष उपाययोजना करून शिस्त आणणे अत्यावश्यक आहे.


## सुवर्ण सहकारी बँक लि.

७५९/५१ डेक्कन जिमखाना, पुणे ४.
फोन : ५८१५४, ५४५२९

— शाखा —

| | | |
|---|---|---|
| ३१ बुधवार पेठ, | २०३५/२ टिळक रोड, | श्रीपूर |
| पुणे २ | पुणे ३० | जि. सोलापूर |
| फोन ४४६५१९ | फोन ४४२६४८ | फोन ५७ |

जे. सी. आगाशे
चेअरमन

# अर्थसंकल्पावरील भाष्य

द. रा. पेंडसे

आर्थिक–प्रमुख सल्लागार, टाटा उद्योग समूह मुंबई.

देशातील नागरिकांना या ना त्या प्रकारे फायदा देणाऱ्या हजारो योजना गेल्या अर्थसंकल्पात समाविष्ट झालेल्या दिसतात. या ज्या छोट्यामोठ्या मेहरबान्या अर्थमंत्र्यांनी केल्या आहेत त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. याची माहिती आता सर्वांना झाली आहेच तेव्हा त्याचा पुनरुच्चार करीत नाही.

## भांडवली गुंतवणूक कर्जरोखे

त्या अनेक योजनांपैकी एका योजनेबाबत तर अर्थमंत्र्यांची विशेष पाठ थोपटली पाहिजे, ती योजना म्हणजे भांडवल गुंतवणूक कर्जरोख्यांची योजना. या अर्थसंकल्पातील सर्वांत विधायक योजना म्हणून याची नोंद करावी लागेल. समाजातील प्रामाणिक श्रीमंतांना एवढे मोठे बक्षिस यापूर्वी कधीच मिळाले नव्हते. जर समाजातील कोणाला प्रामाणिक राहून श्रीमंत व्हावयाचे असेल तर त्यात काही चूक नाही ही गोष्ट प्रथम आपण स्वागताई मानली पाहिजे. त्यांच्यात वरच्या पातळीवर कर भरणारे, हुशार, कल्पक, त्यांच्या व्यवसायाशी निष्ठा ठेवणारे आणि देशातील कायदेकानूंच्या चौकटीत राहून यश संपादन करणारे लोक आहेत. त्यांनी केलेली समाजसेवा त्यांना मिळालेल्या बक्षिसाच्या कितीतरी पटीने अधिक आहे. यापूर्वीचे सरकारी धोरण हे अनेकवेळा अप्रमाणिक श्रीमंतांना चुचकारणारे असे त्यामुळे ज्यांना प्रामाणिक रहाण्याची इच्छा असेल त्यांना राग, निराशा व असाहयतेचे धनी व्हावे लागे.

भांडवल गुंतवणूक रोखे प्रामाणिक माणसाला २५ लाखापर्यंत करपात्र उत्पन्न मिळवून देण्याचे साधन झाले आहे म्हणजे दरसाल २६.८ टक्के मिळकत होईल. या रोख्यांद्वारे २५० कोटी रु. ची रक्कम सरकारी तिजोरीत यावी अशी अपेक्षा आहे. तेवढी रक्कम मिळेल असा मला विश्वास वाटतो. मला मनापासून एवढेच वाटते की नॉर्थब्लॉक मधील नोकरशहांनी या योजनेची सविस्तर आखणी करताना त्याचा बोऱ्या वाजवू नये.

## आयकराच्या दरात वाढ

याच्या उलट दुसरे टोक म्हणजे वरच्या दोन पातळी वरील आयकरात वाढ. उदा. रु. ६०,००१ पासून ७०,००० व रु. ८५,००१ ते १,००,००० रु. ही योजना कोणत्याही दृष्टीकोनातून न्याय्य ठरत नाही. आयकराचे दर कमी केल्याने महसुलावर फारसा विपरीत परिणाम होत नाही ही गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केली नाही. या नव्या दरामुळे महसुलात केवळ ३ कोटी २४ लाख रु. चो जादा भर पडणार आहे. या दोन गटातील उत्पन्नाच्या लोकांनाच फक्त धारेवर धरण्याची वृत्ती यात दिसून येते. आयकरांच्या गटात या आणखी दोन गटांची भर टाकून आयकर वसुलीचे कार्य सोपे व सुटसुटीत करण्याच्या घोषित कार्याला बाधा यतो. सरकारी नोकरांचे पगार हे ६० हजार रु. उत्पन्नाच्या खाली असल्यामुळे त्यांच्यावर या नव्या योजनेचा काहीच परिणाम होणार नाही. या गटात येणारे लोक म्हणजे कंपन्यांचे संचालक व खाजगी क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, व्यावसायिक व व्यापारी अर्थातच खाजगी क्षेत्र हा एक योगायोगच आहे असे मानावयास पाहिजे.

भांडवल गुंतवणूक कर्जरोखे योजना व आयकर दरात वाढ या दोन टोकाच्या योजनांमध्ये काही चांगल्या योजनाही आहेत. या योजना आपआपल्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत परंतु जागेच्या संकोचामुळे त्यांचा मी उल्लेख करत नाही. अर्थसंकल्पातील अशा काही सवलती असताही मन अस्वस्थ करणाऱ्या काही गोष्टी आहेत या मुद्याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

## मन अस्वस्थ करणाऱ्या गोष्टी

५२३ कोटींची कर योजना + २६१ कोटींची रेल्वे अर्थसंकल्पातील दरवाढ + अर्थसंकल्पापूर्वी केलेली ३२० कोटींची दरवाढ + पोस्ट व टेलिग्राफ खात्याने लोकांवर टाकलेला १३५ कोटींचा बोजा, याखेरीज सरकारने आपल्या एकाधिकार व्यवहारातील वस्तूंची केलेली दरवाढ असा एकूण १३० कोटींचा भार १९८२ ८३ साली लोकांना सोसावा लागणार आहे. गेल्या दोन वर्षात जेवढा पैसा उभा करण्याचा प्रयत्न झाला त्याच्या दुप्पट एवढी ही रक्कम आहे. त्यामुळे हळूहळू सर्व क्षेत्रात दरवाढ होऊन सामान्य माणसाला त्याचा विपरित परिणाम भोगावा लागेल.

दुसरे म्हणजे महसुली खात्यावर यावर्षी ६२६ कोटींचा प्रचंड तूट येईल असा अंदाज आहे. कदाचित हा आकडा यापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात करवाढ करूनही केंद्र सरकारला दैनंदिन खर्चाला पैसा अपुरा पडत आहे. अशा परिस्थितीत नियोजन, विकास व गुंतवणूक याची भाषा करण्यात काय अर्थ आहे. गरीब व विकसनशील देशाला न परवडणारी अशी ही गोष्ट आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा कारभार अगदीच असमाधानकारक आहे. सरकारचा याबाबतचा दावा पोकळ आहे. १९८०-८१ साली १८२३१ कोटींच्या भांडवलावर केवळ ३९ कोटींचा नफा मिळाला आणि ताही करपूर्व. सरकारने प्रसिद्ध केलेल्या आर्थिक अहवालातच हे नमूद केले आहे. आणि हा सर्व पैसा लोकांच्या कष्टाचा आहे ही गोष्ट जास्त महत्त्वाची. म्हणजे रुपयाच्या ०.२ पैसे एवढी ही रक्कम येते. रिझर्व्ह बँकेने केलेल्या एका पाहणीत असे आढळून आले आहे की, खाजगी क्षेत्रात हेच प्रमाण वर्षाला १० पैसे होते. याचा सरळ अर्थ असा की या सार्वजनिक क्षेत्राने सरकारला १८०० कोटी रुपयांना घाट्यात टाकले पाटबंधारे योजना, वीजमंडळे, वाहतूक महामंडळे या राज्य सरकारांच्या उद्योगांची स्थिती तर याहूनही शोचनीय आहे. सरकारने तज्ज्ञांकडून या उद्योगांच्या मूलभूत पायाची पाहणी करून घेतली पाहिजे म्हणजे लोकांना आपला पैसा चांगल्या सामाजिक कार्यासाठी वापरला जात आहे याची खात्री पटेल.

तुटीचा फेर अंदाज व प्रत्यक्ष तूट यात जो प्रचंड तफावत दिसते ही तर फार मोठ्या चिंतेची बाब आहे. १९८०-८१ चेच उदाहरण घेऊ या, अर्थसंकल्पात १४४५ कोटींची तूट धरली होती. फेर अंदाजात ती १९७५ कोटींवर गेली आता ती प्रत्यक्षात २५७७ कोटी येईल असे हळूच सांगण्यात येत आहे. दरवर्षीची हीच कथा आहे. या तफावतीचा अर्थ हाच की अर्थसंकल्प तयार करण्याची आपली क्षमता अगदीच कमकुवत आहे. लोकांना फसविण्याचाच हा एक प्रकार आहे.

नियोजनाच्या आघाडीवरही सर्वकाही ठीकठाक नाही. सहाव्या योजनेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी दरवर्षी ५००० मेगॅवॅट वीजनिर्मिती वाढविणे आवश्यक आहे. पण गेल्या वर्षी फक्त ३५०० मे. वॅ. चे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट अर्थातच खालच्या पातळीवर आहे. यामुळे वीजपुरवठा फार मोठ्या प्रमाणात जाणवेल. रेल्वेच्या व्यवहारात १९८१-८२ साली वाढ झाली. २२ कोटी टन मालाची ने-आण रेल्वेने केली. परंतु आता ते कमाल मर्यादेला पोहोचले आहेत. नवे रेल्वेमार्ग घातल्याशिवाय व वाघिणी आदि वाढविल्याशिवाय यात आणखी वाढ होणे आता शक्य नाही. परंतु याबाबतच्या योजना अगदीच तटपुंज्या आहेत. कोळशाचे उत्पादन १ कोटी टनांनी वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. परंतु कोळसा वाहून नेण्याची रेल्वेची क्षमता मात्र २० ते ३० लक्ष टनानीच आहे. म्हणजे कोळशाच्या टचाईचा प्रश्न तसाच राहणार. पोलादाच्या विविध प्रकारांबाबत मागणीपेक्षाही पुरवठा कमीच राहणार असे दिसते. म्हणजे १९८३-८४ मध्ये उद्योगधंद्याच्या गरजांबाबतचा परिस्थिती बिकटच राहणार.

काळा पैसा व विविध धंद्यातील मंदीच्या विरुद्ध काही उपाययोजना करण्याचे धोरण दुर्दैवाने अंदाजपत्रकात दिसत नाही. बेकारीच्या समस्येकडेही दुर्लक्षच केलेले दिसते. मंत्र्यांची आश्वासने वा भाषणे काहीही असली तरी गेल्या वर्षात बेकारी वाढली आहे, कमी झालेली नाही हेच सरकारच्या आर्थिक अहवालावरून आढळते. दारिद्र्य रेषेखाली एक वर्षापूर्वी जेवढे लोक होते त्यापेक्षा आता जास्त आहेत आणि हीच हलाखीची परिस्थिती पुढीलवर्षी राहील. त्यामुळे अनेक नाही परंतु ज्या डझनभर चांगल्या गोष्टी अर्थसंकल्पात आहेत त्याचा एकूण समाजाला साहचभूत होणाऱ्या नाहीत.

(फोरम ऑफ फ्री एंटरप्राइजच्या सहकार्याने)

# खाजगी उद्योगात तोटा आल्यास काय करावे ?

भा. पु. चक्रपाणी
नागपूर

खाजगी उद्योगधंद्यात मोठा तोटा आल्यास ते बंद पडतात. उद्योगधंद्यात नफा होणे आवश्यक असते. जर नफा होत नसेल व तोटाही नसेल तर असा उद्योग ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालत आहे असे समजावे लागेल. परंतु ना नफा ना तोटा या तत्त्वाचा अवलंब करताना सुद्धा अनेक आर्थिक बाबी सांभाळाव्या लागतातच.

कोणत्याही खाजगी उद्योगाचे उद्दिष्ट नफा कमावणे हेच असते. ज्या उद्योगात नफ्याचे प्रमाण अधिक तो उद्योग सुरू करण्याकडे साधारण प्रवृत्ती असते. परंतु नफा किती झाला पाहिजे हे ठरविता आले तरी व्यवहार्यत: तेवढा नफा होतोच असे नाही. कित्येकदा तोटा होतो. असे का होते हे अभ्यासाने लक्षात येते. उत्पादन खर्च हा विक्रीपेक्षा कमी झाला म्हणजे तेवढा ढोबळ नफा होतो. या ढोबळ नफ्यातून व्यवस्थापकीय खर्च भागवायचा असतो. व्यवस्थापकीय खर्च ढोबळ नफ्यापेक्षा कमी झाला तर तेवढा निव्वळ नफा उरतो. जर व्यवस्थापकीय खर्च ढोबळ नफ्यापेक्षा जास्त झाला तर तेवढा तोटा झाला असे समजतात.

## तोट्याची संभाव्य कारणे

साधारणपणे उत्पादन खर्चात कच्चा माल खरेदी, (यात शिल्लक कच्चा माल समाविष्ट करतात) वाहतूक खर्च, मजूरी, कारखान्याचा वीज खर्च अथवा तेल, कोळसा खर्च व उत्पादन प्रत्यक्ष प्रक्रियेत होणारा खर्च येतो. उत्पन्नात विक्रीपासून येणारे उत्पन्न व अन्य संबंधीत उत्पन्न यांचा समावेश होतो. यातून ढोबळ नफा निघतो. व्यवस्थापकीय खर्चात वेतन, कर, कार्यालयीन खर्च, तरतूद, भागीदारांच्या भांडवलावरील व्याज, किंवा चालकाचे वेतन, यंत्रसामग्रीवरील घसारा अशासारख्या बाबींचा समावेश होतो. ढोबळ नफ्यातून हा खर्च वजा जाता उरतो तो निव्वळ नफा.

जर तोटा आला तर त्याची कारणे पुढीलप्रमाणे संभवतात.

१) ढोबळ नफा पुरेसा मिळालेला नाही याचे कारण उत्पादन प्रक्रियेवर अधिक खर्च होतो किंवा विक्री कमी पडते अथवा विक्रीबाबत मूल्यनिर्धारण बरोबर झालेले नाही.

२) व्यवस्थापकीय खर्च जास्त होतो किंवा व्यवस्थापकीय खर्चात खोटा खर्च मिळवलो आहे. खोटा खर्च म्हणजे जो प्रत्यक्षात होत नाही पण खोटे हिशेब ठेवून झाला असे दाखविणे.

## नवीन भांडवल घालणे

वरील कारणांमुळे एखादा उद्योग तोट्यात चालला तर तोटा सग्रहत जातो व तो उद्योग आजारी पडून बंद पडतो. तो चालू करण्यासाठी नवीन भांडवल घालावे लागते. ते कर्जरूपाने अथवा भागदारकांनी किंवा चालकाने स्वत:चे घालावे लागते. नवीन भांडवल घातल्यानंतर पुन्हा उद्योग सुरू करता येतो परंतु त्याच बरोबर कारखान्याच्या मालाला मागणी असणे, माल चांगल्या प्रतीचा असणे, उत्पादन खर्चापेक्षा विक्रीचे उत्पन्न सर्व खर्च भरून येईल इतके असणे आवश्यक असते. म्हणून बंद किंवा आजारी उद्योग नवीन भांडवल घालून पुन्हा चालू करण्यापूर्वी या बाबी लक्षात घेऊन त्याप्रमाणे आराखडा व प्रकल्प तयार करावा लागतो.

अनेकवेळा यंत्रसामग्री जर चांगली असेल तर तीवर प्रतिवर्षी आकारलेला घसारा हा तोट्यातून वळता करून खरे चित्र लक्षात येते व झालेला तोटा भ्रामक समज-

ण्यात येतो व कारखाना बंद न पडता चालू ठेवता येतो. अर्थात घसारा दाखविणे आवश्यकच असते परंतु तो कारखान्याचे गुप्त भांडवल म्हणून सुद्धा समजता येईल. नवीन यंत्रसामग्रीसाठी वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य दीर्घ मुदतीच्या फेडीने मिळत असल्यामुळे यंत्रसामग्री जुनी झाली म्हणून उद्योगधंदा बंद पाडण्याची आवश्यकता नसते.

## ना नफा ना तोटा तत्त्व

संग्रहित तोटा प्रतिवर्षी नफा सुरू झाल्यानंतर कमी करता येवून पूर्ण तोटा भरून निघाल्यावरच नफ्यातून भागीदारांनी, चालकांनी वाटा घेणे इष्ट असते, किंवा नवीन भांडवल धंद्यात आतल्यानंतर त्यातून तोटा वजा करता येतो व उर्वरीत भांडवल धंद्यासाठी समजता येते. मात्र तोटा आल्यानंतर कारखाना/उद्योगधंदा चालू ठेवण्यासाठी नवीन भांडवलाबरोबरच तोटा का झाला त्याचो कारणे शोधून उद्योग नफ्यात चालविता यईल अशाप्रकारे काळजी घ्यावी लागते.

ना नफा ना तोटा या तत्त्वावर जेव्हा उद्योग चालविला जातो त्या परिस्थितीत सुद्धा भागीदार व चालक यांनो वेतन किंवा मजूरी, किंवा भांडवलाचा मोबदला, कर्तृत्वाचा मोबदला इत्यादी स्वरूपात काही रक्कम घेतली तर ती व्यवस्थापकीय खर्च म्हणून दाखविता येते व एकूण उत्पन्न/खर्च यांचा मेळ जमविता येतो.

## तज्ज्ञांचा संघ असावा

उद्योगधंद्यात चार्टर्ड अकौंटंट, कॉस्ट अकौंटंट वगैरे तज्ज्ञ एकूण हिशोब व उत्पादन खर्च याबाबत योग्य ती काळजी घत असतात. सर्वच उद्योगधंद्यांना तज्ज्ञ मिळतातच असे नाही. लहान उद्योगांना तज्ज्ञ ठेवणे शक्यही नसते. म्हणून तज्ज्ञ मंडळींनी मार्गदर्शन करणारी एखादी यंत्रणा (Pool) तयार करून त्याप्रमाणे तोटा आलेला उद्योग बंद पडत असल्यास त्याची कारणे शोधून मार्गदर्शन करावे असे सुचविता येईल. अर्थात हिशोब तज्ज्ञ हे फक्त खर्च व उत्पन्न याबाबतच आकडेमोड करतात व ती झालेल्या खर्च व उत्पन्नावर आधारीत असते. मात्र उत्पन्न कसे वाढेल व खर्च कसा भरून येईल हे ठरविणे उद्योजकाचे कर्तव्य असते. त्याबाबतात त्याचा तोच निर्णायक असतो. मात्र तोटा आल्यास तो होऊ नये म्हणून उद्योजकाने काळजी घ्यावी हे इष्ट असते. मालाला मागणी असूनही तोटा असल्यास उत्पादन प्रक्रियेत सुधारणा करणे आवश्यक असते. तात्पर्य, कारखानदारीत नफेबाजी असू शकते मात्र तोटाही असतो म्हणून वाजवी नफा मिळावा यासाठी उद्योजकाला प्रयत्न करावे लागतात.


# जनता सहकारी बँक लि. पुणे

फोन नं. ४४३२५८

मुख्य कचेरी : १४४४ शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव रस्ता, पुणे ४११ ००२.

आपल्या जीवनातील आकांक्षा, सुखस्वप्ने
सत्यसृष्टीत साकार करणे करिता बचत.....

बचती करीता.....

जनता सहकारी बँक लि. पुणे
१४४४ शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव रोड, पुणे-२.

हसतमुख सेवा — आकर्षक व्याजदर

विविध आकर्षक ठेव योजना

७ जिल्ह्यांत २९ शाखा व ३ एक्स्टेन्शन कॉटर्ससह सेवेसी

व. बि. आपटे — कार्याध्यक्ष

का. श्री. काकतकर — कार्यकारी संचालक

# आजारी उद्योगधंद्याची समस्या

प्रा. जे. एस्. चौधरी
वाई

केंद्र व राज्य सरकारे, सरकारी सहाय्याने चालणाऱ्या वित्तीय संस्था व व्यापारी बँका यांचे जवळजवळ दोन हजार कोटी रुपये भारतातील आजारी उद्योगधंद्यात गुंतून पडलेले आहेत. एवढ्या प्रचंड भांडवल गुंतवणुकीचे भवितव्य धोक्यात असल्यामुळे ही एक चिंतेची बाब ठरणार आहे. रिझर्व बँकेच्या प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीप्रमाणे एककोटीपेक्षा जास्त कर्ज ज्या उद्योगांना बँका देतात असे ३७८ उद्योग आजारी आहेत व त्यांच्याकडे असलेले अंदाजे ११६० कोटी रुपये बँकांचे कर्ज बुडण्याची शक्यता आहे. यात इंजिनियरिंग वीज, लोखंड पोलाद व कापड या उद्योगांचा क्रमांक वरचा लागतो. जवळजवळ ५८ ०|० आजारी उद्योग या क्षेत्रातले आहेत असे दिसते. त्याचबरोबर २०.७५ लहान उद्योग १९७९ अखेर आजारी असल्याचे प्रसिद्ध झालेले आहे. यातील बरेच उद्योगधंदे वेळीच उपाय योजले नाहीत तर बंद पडण्याची भिती व्यक्त केली जात आहे. भारतामध्ये दरवर्षी हजारो उद्योग सुरू केले जातात व जवळपास तेवढेच दरवर्षी बंद पडतात. काही वर्षी तर बंद पडलेल्या उद्योगांचीच संख्या जास्त असल्याचे दिसते. गेल्या काही वर्षात आजारी उद्योगधंद्याची संख्या प्रचंड वेगाने वाढते आहे. यासाठी आवश्यक त्या उपाययोजना वेळेवर न झाल्यास याचे गंभीर परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होणे अपरिहार्य आहे.

कोणत्याही उद्योगधंद्याच्या आजारपणाचे निदान कसे करावयाचे व त्याची लक्षणे कोणती हे ठरविणे काहीसे अवघड आहे. सर्वसामान्यपणे जो उद्योग प्रगती करू शकत नाही त्या उद्योगाला नफा मिळविण्यात अपयश येते व आपले कर्ज व देणी वेळेवर भागवता येत नाहीत अशा उद्योगाला आजारी उद्योग म्हटले जाते. अनेकदा आजारी उद्योग आपली अप्रतिष्ठा होऊ नये म्हणून तसेच चालू राहतात व इतर सुस्थितीतील उद्योगही आजारी पडतात अशा उद्योगातील साधारण भागांची बाजारातील मागणी व किंमत खूप चढत जाते. त्याचबरोबर नफ्याचे भांडवलाशी, विक्रीशी व एकूण कर्जाशी प्रमाण एकसारखे घटत जाते. रिझर्व्ह बँकेच्या व्याख्येप्रमाणे ज्या उद्योगात कोणत्याही एका वर्षी पैशाची तीव्र टंचाई असते व व्यापारी बँकांच्या मते नंतरच्या दोन वर्षात अशी कमतरता तीव्र होण्याची शक्यता असते त्या उद्योगाला आजारी उद्योग म्हटले जाते. रिझर्व्ह बँकेने आपले मत १९७६ मध्येच सर्व बँकांच्या निदर्शनाला आणून दिले होते. तरीही व्यापारी बँकांचा बराचसा पैसा अशा आजारी उद्योगात आजही अडकून पडलेला आहे.

कोणत्याही उद्योगाच्या आजारपणाच्या कारणांची मीमांसा केल्यास त्यांचे बहिर्गत, अंतर्गत व तांत्रिक असे तीन प्रकार पाडता येतात. बहिर्गत कारणामध्ये गळेकापू स्पर्धा, वस्तूच्या मागणीतील घट, दैवी व नैसर्गिक आपत्ती, सरकारचे बदलते धोरण, कामगारांमधील असंतोष, कच्च्या मालाचा तुटवडा इत्यादींचा समावेश होतो. तर अंतर्गत कारणामध्ये प्रामुख्याने अकार्यक्षम व्यवस्थापनाला जबाबदार धरले जाते. यात कल्पक नियोजनाचा अभाव, खर्चाचे वाढते प्रमाण व सर्वच बाबतीत पैशांची उधळपट्टी अफरातफर, मालमत्तेची नासधूस, अतिभांडवलीकरण, उधळे लाभांश धोरण भविष्यकाळासंबंधी चुकीचे अंदाज यांचा समावेश होतो. तांत्रिक कारणामध्ये जुनी यंत्रसामुग्री, शास्त्रीय व्यवस्थापनाचा अभाव, प्रमाणीकरण व वैशिष्ठ्यकरणाचा अभाव, अकुशल कामगार व व्यवस्थापक, उत्पादनाचा हीन दर्जा इत्यादि गोष्टी येतात. असे असले तरी एखादा उद्योग जेव्हा आजारी पडतो तेव्हा त्याची एकाच वेळी अनेक कारणे असण्याची शक्यता नाकारता येत नाही, परंतु जवळजवळ ९० टक्के आजारी उद्योगांचे मूळाशी अकार्यक्षम, अननुभवी व अपात्र व्यवस्थापच असते ही वस्तुस्थिती आहे.

सुरुवातीलाच नमूद केल्याप्रमाणे उद्योगधंद्यांच्या आजारपणाचे वाईट परिणाम त्या उद्योगाबरोबर सर्व समाजाला भोगावे लागतात. असे आजार एखाद्या संसर्गजन्य रोगासारखे पसरणे शक्य असल्यामुळे इतर उद्योगावरही त्याचे गंभीर परिणाम होत राहतात. योग्य काळजी न घेतल्यास व वेळीच उपाययोजना न केल्यास असे उद्योग गुंडाळावे लागतात. तसे झाल्यास पैशाअभावी सावकार व भागधारकांचे पैसे परत करणे अशक्य होते कामगारावर बेकारीचो पाळी येते. व्यवस्थापनाची अप्रतिष्ठा होते व प्रत्येक उद्योग हा सामाजिक संस्था असल्यामुळे तो बंद पडणे सामाजिक व आर्थिक या दोन्हा दृष्टींनी घातक असते. कदाचित असा आजारी उद्योग वाचवण्याचा प्रयत्न झाल्यास भागधारक, सावकार व कर्मचाऱ्यांना बराच त्याग करावा लागतो व त्यामुळे त्यांचेही नुकसान होते.

अशा आजारी उद्योगधंद्याची पुनर्रचना व पुनर्बांधणी होऊन असे उद्योग सुधारावेत यासाठी रिझर्व्ह बँकेने एक विशेष विभाग निर्माण केलेला असून त्या विभागामार्फत आजारी उद्योगधंद्यांची पहाणी करण्यात येते व त्यांना पुनर्जीवन प्राप्त करून देण्यासही प्रयत्न केले जातात. व्यापारी बँकानी अशा उद्योगाकडे सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून त्यांना शक्य ती मदत करावी व त्याचा दृष्टीकोन सामाजिक उद्दिष्टांशी सुसंगत असावा यासाठी त्यांना मार्गदर्शन केले जाते. या बँकांना उद्योगाचे आजारपण प्राथमिक अवस्थेत ओळखता यावे आणि उपाययोजना लगेच करता यावी यासाठीही काही सूचना रिझर्व बँक वेळोवेळी देत असते. तसेच सरकार व्यापारी बँका व वित्तीय संस्था यांच्यात आजारी उद्योगांना मदत करण्यासाठी सुसूत्रता असावी यासाठीही रिझर्व बँक प्रयत्नशील असते.

अलिकडे केंद्र व राज्य सरकारे काही आजारी उद्योग आपल्या ताब्यात घेऊन त्यांना पुनरजीवन प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करीत आहेत परंतु त्यामुळे हा गंभीर प्रश्न सुटेल असे नाही. काही उद्योगाचे व्यवस्थापन सरकारकडे जावूनही फारशी प्रगती झालेली नसून उलट भरमसाठ तोटेच होत आहेत. केवळ सरकारचे व्यवस्थापन असल्यामुळे बँकांना नाखुशीने अशा उद्योगांना भांडवल पुरवठा करावा लागल्यामुळे बँकांना ही त्याची झळ पोचत आहे. दुसरे असे की सरकारने ठरविले तरी सर्व आजारी उद्योग सरकारला ताब्यात घेणे शक्यही नसल्यामुळे हा अगदी शेवटचा उपाय होऊ शकतो. त्याऐवजी सरकारने अशा उद्योगांना व्यवस्थापनाच्या दृष्टीने निश्चित मार्गदर्शन करावे, शक्य झाल्यास किमतीविषयक संरक्षण व्हावे, कच्चा माल उपलब्ध करून द्यावा किंवा आजारी उद्योगांना सुस्थितीतील उद्योगांत विलीन व्हायचे असल्यास सरकारने त्यास ताबडतोब परवानगी द्यावी. यासारखे उपाय योजून सरकारला अप्रत्यक्षपणे आपला वाटा उचलता येईल.

उद्योगाच्या आजाराचे निदान होणे व उपाययोजनेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. चुकीचे निदान झाल्यास तसे उपाय योजल्यास आजार जास्त गंभीर होण्याचीच शक्यता असते. यासाठी उद्योग त आजाराची किंचितशी लक्षणे दिसताच किंवा तसा संशय येताच त्याचा जास्त खोलवर व तपशीलवार अभ्यास व्यवस्थापनाने केला पाहिजे. उदा. अकार्यक्षम व अपात्र व्यवस्थापन हेच जर आजाराचे कारण असेल तर त्यासाठी व्यवस्थापनात ताबडतोब बदल केला पाहिजे. किंवा जुनाट यंत्रसामुग्रीमुळे उत्पादन कमी होऊन उद्योग तोटयांत असेल तर यंत्रसामग्रीचे आधुनिकरण केले पाहिजे. या सर्व उपाययोजना परताना सर्व संबंधितांचे सहकार्य असणे गरजेचे आहे. उदा. यंत्रसामग्रीचे आधुनिकरण करण्यास कामगारानी व त्यांच्या संघटनांनी विरोध करून चालणार नाही. जितक्या लवकर अशी उपाययोजना करता येईल तेवढ्या लवकर केल्यास सुधारणा होण्याची जास्त शक्यता निर्माण होईल.

आपल्याकडे असे निदर्शनास येते की काही उद्योग मुद्दामहून आपली जबाबदारी टाळण्यासाठी आपल्या उद्योगधंद्यांना आजारी पाडतात. एक उद्योग आजारी पाडतात. एक उद्योग आजारी पाडून बंद पाडावयाचा व त्याची मालमत्ता इतरत्र नेवून नवीन उद्योग सुरू करावयाचा व आजारी उद्योगाची जबाबदारी सरकारने उचलावी व बँकांना व वित्तीय संस्थांना बुडवावे अशी प्रवृत्ती काही ठिकाणी दिसून येते. अशा नवीन उद्योगांना बँकांनी व वित्तीय संस्थांनी अजिबात मदत करण्याची गरज नाही. एका उद्योगपतींच्या

आंतरराष्ट्रीय परिसंवादात एका पाश्चात्य देशातील उद्योगपती मंमतीने म्हणाले की भारतातील बडे उद्योग आजारी पडतात परंतु उद्योगपती मात्र (आर्थिक दृष्टीने) कधीच आजारी पडत नाहीत. ते लक्षपती असून चैनीचे जीवन जगत असतात.

आपल्या देशातील उद्योग कामगाराभिमुख (labour intensive) असल्यामुळे कामगार व व्यवस्थापन यांचे संबंध सलोख्याचे राहिले तर बरेचसे उद्योग आजारी होणार नाहीत. कामगारामधील बेशिस्त, गैरहजेरी व परस्पर विश्वासाचा अभाव या गोष्टी औद्योगिक क्षेत्रात प्रकर्षाने जाणवतात. अनेकदा उद्योगाची दयनीय अवस्था डोळ्यासमोर असूनही २० टक्के पर्यंत बोनस मागणाऱ्या कामगार संघटना व त्यांचे पुढारीपण करणारे आपल्याकडे आहेत. बऱ्याच आजारी उद्योगात जादा कामगार (surplus labour) असतात व त्यांची उत्पादकताही तुलनेने कमी असते. अशा परिस्थितीत कामगारांनी संपूर्ण सहकार्य केल्याशिवाय उद्योग उर्जितावस्थेत येणे कठीण आहे. मालक व कामगार यांनी स्नेहपूर्ण संबंध प्रस्थापित करून औद्योगिक कलह टाळणे गरजेचे आहे.

याशिवाय उद्योग आजारी पडू नयेत यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेही शक्य आहे. व्यापारी बँकांकडे उद्योग जी वारंवार माहिती पाठवतात तिची छाननी करून या बँकांनी अशा उद्योगांना वेळीच इशारा दिला पाहिजे. यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी मोठ्या शहरामधील शाखात एक वेगळी छाननी व मार्गदर्शन विभाग सुरू करणे गरजेचे आहे. व्यवस्थापनाने उद्योगात अधिक किंवा कमी भांडवलीकरण होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. पारंपारिक पद्धतीने व्यवस्थापन न करता शास्त्रीय व्यवस्थापनाचा अवलंब केला पाहिजे. जास्तीत जास्त उद्योगांच्या व्यवस्थापनासाठी प्रशिक्षण, परिसंवाद व चर्चा आयोजित करून या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीची जाणीव त्यांना करून दिली पाहिजे. पाश्चात्त्य देशाप्रमाणे भारतात व्यवस्थापन सल्लागारांचा (Management Consultants) मोठा वर्ग तयार झाला तर उद्योगांना योग्य व निश्चित मार्गदर्शन होऊन आजारीपणाचा धोका टाळता येईल यासारखे इतरही काही उपाय योजून सरकारने व संबंधितांना बघ्याची भूमिका न घेता आजारी उद्योगांची समस्या ही एक राष्ट्रीय समस्या मानून ती सोडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे व राष्ट्रीय संपत्तीचा अपव्यय टाळला पाहिजे.

---

## एक महत्त्वाचे निवेदन–निबंध स्पर्धा

इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को ऑपरेशन या संस्थेतर्फे प्रतिवर्षी एक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून सहकार या विषयावरील नव्या संशोधनपर निबंधास श्रीपाद सुबराव मलमकी स्मारक १ हजार रुपयाचे पारितोषिक देण्यास येणार आहे. जुलै ८१ ते जून ८२ या काळात ज्या व्यक्तींनी इंग्लिश भाषेत आपला प्रबंध, शोधनिबंध, मोनोग्राफ इ. प्रसिद्ध केले असेल त्यांनी ३१ ऑगस्ट १९८२ च्या आत सेक्रेटरींकडे संपर्क साधावा.

पत्ता – सेक्रेटरी I. S. Sc., राज्य सहकारी संघ ५ बी. जे. रोड, पुणे.

---

## स्वागत

पुण्याला येत्या जुलै–ऑगस्टमध्ये कार्यान्वित होणाऱ्या नव्या शेअर बाजाराची भर पडणार असल्यामुळे पुण्याचे महत्त्व औद्योगिक व वित्तीय क्षेत्रात अधिक वाढेल.


शेअर बाजारात मान्यता पावलेल्या पुण्याच्या बड्या उद्योगांना येथल्या येथे शेअर विक्रीच्या रूपाने भांडवल उभे करणे आता सोयीचे होईल. जाणकारांच्या अंदाजाप्रमाणे पुण्यात पहिल्याच वर्षी ७ कोटींच्या आसपास उलाढाल होईल. याबाबतीत अधिक माहिती हवी असल्यास मराठा चेंबर पुणे, यांचेकडे संपर्क साधावा.

सेन्ट्रल बँकेची धनवृध्दी जमा योजना म्हणजेच आपल्या

# उत्कर्षाची गुरुकिल्ली!

**धनवृद्धी जमा योजनेचा तक्ता**

| गुंतवणूक | महिने | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रुपये | १२ | ३६ | ६३ | ८४ | १२० |
| १०० | १०८.२५ | १३४.५० | १६८.०० | १९९.६५ | २६८.५५ |
| ५०० | ५४१.२५ | ६७२.५० | ८४०.०० | ९९८.२५ | १३४२.७५ |
| १००० | १०८२.५० | १३४५.०० | १६८०.०० | १९९६.५० | २६८५.५० |
| २००० | २१६५.०० | २६९०.०० | ३३६०.०० | ३९९३.०० | ५३७१.०० |
| ३००० | ३२४७.५० | ४०३५.०० | ५०४०.०० | ५९८९.५० | ८०५६.५० |
| ५००० | ५४१२.५० | ६७२५.०० | ८४००.०० | ९९८२.५० | १३४२७.५० |
| १०००० | १०८२५.०० | १३४५०.०० | १६८००.०० | १९९६५.०० | २६८५५.०० |




या योजनेतील गुंतवणूक आपल्या भविष्यातील गरजा उदा. मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न इ. साठी निश्चितच उपयुक्त ठरेल

जागोजागी जनतेकडे जाणारी बँक सेन्ट्रल बँक

## सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया

(भारत सरकारचा उपक्रम)

सत्यं शिवं सुंदरम् प्रकाशनच्या मालकीचे हे मासिक संपादक व मुद्रक प्रा. कमलाकर परचुरे यांनी वैशाली प्रिंटर्स, १८१ शुक्रवार पेठ, पुणे २. येथे छापून ९२६ शिवाजीनगर पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.

Regd No. PNC 205 Licence to post without prepayment No. 61

# अभिनंदन, अपेक्षा !

**आठवा वित्त आयोग** – महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते, केंद्रातील भूतपूर्व संरक्षण मंत्री, गृहमंत्री व अर्थमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांची आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणून नुकतीच नियुक्ती झाली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. 'अर्थ' नियतकालिकावर ना. चव्हाण यांचा नुसताच शाब्दिक लोभ नसून, त्यांनी अर्थाकरता विशेष लेख पाठवून 'अर्था' ला सक्रिय प्रोत्साहन दिले आहे. ना. चव्हाण यांनी त्यांच्या नव्या कार्याची सूत्रें नुकतीच घेतली असल्या कारणाने त्यांचेकडून ह्या विषयावरील त्यांचे विचार किंवा दृष्टिकोन या संबंधीचा लेख, नूतीस घेण्यापेक्षा विशेषत: दिवाळी अंकात संपादन करण्याचा मानस आहे.

या पूर्वीचे सात आयोग, १९५२-५७, ५७-६२, ६२-६६, ६६-६९, ६९-७४, ७४-७९, ७९ ते ८२ या कालावधीकरता झाले. त्यांचे अध्यक्षस्थान अनुक्रमे ना. निओगी, ना. संथानम, श्री चंदा, न्या. राजमन्नार, ना. त्यागी, ना. ब्रह्मानंद रेड्डी व न्या. शेलट यांना भूषविले होते. आठव्या आयोगाचे अध्यक्ष ना. चव्हाण आहेत.

आयोगाचे सदस्य म्हणून प्रा. हनुमतराव हे पूर्वीच्या ७ व्या आयोगातही होते. तसेच प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापनाच्या सुधारणा समिती व नियोजन मंडळ या महत्वाच्या यंत्रणेत त्यांचा मोठा सहभाग आहे.

आठव्या आयोगासंबंधी काम करतांना प्रामुख्याने ना. चव्हाण यांचेकडून वित्त विषयक स्फोटक प्रश्नांना कोणती उत्तरे मिळतात ते पहावयाचे आहे. प्रथमत: राज्य व केंद्र यांच्या करांच्या उत्पन्नाचे विभाजन कोणत्या निकषांवर करावयाचे त्यासबंधी सत्तारूढ कांग्रेस पक्षाच्या राज्यांमध्येच असंतोष आहे. प. बंगाल सरकारने तर या संपूर्ण रचनेलाच आव्हान दिले आहे. दुसरे म्हणजे आसाम, ओरिसा इ. सारख्या मागासलेल्या राज्यांना अनुदाने कशी द्यावयाची हे ठरविणे. तिसरे म्हणजे राज्यांनी न फेडलेल्या उचलीमुळे (overdraft) निर्माण झालेल्या चलन विषयक समस्या आणि चवथी नाजूक बाब म्हणजे घटनेच्या २६९ कलमान्वये केंद्राने नव्या करांच्या सहाय्याने सरकारी जमेत वाढ करण्याचे उचित मार्ग शोधणे. अलिकडच्या १०-१५ वर्षात वित्त आयोगाच्या कार्याचे एकूण महत्व घटत चालले आहे. त्याबरोबरच त्याचे राजकीय पडसाद (repurcussions) असाधारण महत्वाची झाली आहेत. या दृष्टीनेच ना. चव्हाण यांची नियुक्ती झाली. अन्यथा एखाद्या निवृत्त न्यायमूर्तींकडेच हे काम देण्याचा असा संकेत होता.

**संकलित अर्थवृत्त –**

● ३० जुलै १९८२, एम्3 ($M_3$) = एकूण रोख चलन + बँक मागणी ठेवी + मुदती ठेवी व इतर ठेवी) ६५७२४ कोटी रुपयांचे होते. मागील वर्षीच्या जुलैमध्ये $M_3$ चलन ६,७२४ कोटी रुपयांनी जास्त होते.

● बँक ठेवींमध्ये ६ ऑगस्टच्या पूर्वीच्या पंधरवड्यात २५५ कोटींनी वाढ झाली तर बँक कर्जात [illegible]२४ कोटींची घट झाली. ऑगस्ट १९८२ मध्ये एकूण बँक ठेवी ४६,३२४ कोटी तर एकूण कर्ज ३०,४५१ कोटी होते.

● सोन्याची किंमत १० ग्रॅमला १६६० रुपये आणि चांदीची रु. २५९० दर किलोस राहिली. (ऑगस्ट १९८२ महिन्यात)

● १९७०-७१ हे पायावर्ष धरल्यास, ऑगस्ट १९८२ चा सर्वसाधारण किंमत निर्देशांक २९०.७ असून, मागील वर्षाशी तुलना करता १.१ टक्का वाढला आहे. पतनियंत्रण कठोर केल्यामुळेच किंमतवाढ प्रमाण प्रभावित झालेली दिसते.

---

- **आगामी अंक (जून ते सप्टेंबर) सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात प्रसिद्ध होईल.**
- **पत-कोंडी (credit squeeze) आणि औद्योगिक मंदी (Industrial recession) यावर विशेष लेख-साहित्य.**